I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 207-209
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# आधुनिक शिक्षणात अंकीय (Digital Library) ग्रंथालयाची भूमीका

प्रो. जगदीश डोमाजी डहाट

ग्रंथपाल
जिवन विकास शिक्षण महाविद्यालय, थुगांवदेव
Corresponding Author : cwalde549@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**
आज ग्रंथालयात ग्रंथ देण्यासाठी देवघेव पध्दतीचा वापर केल्या जात असला तरी, उपभोक्त्याला आवश्यक ती उपयुक्त माहिती, जगाच्या कोणत्याही कोप–यातून इंटरनेटच्या माध्यमाने आवश्यक त्या ठिकाणी उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे उपभोक्त्याचा वेळ वाचतो व त्यांच्या संशोधन कार्याला गती प्राप्त होते. प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश आवश्यक ती उपयुक्त माहिती संशोधकास लवकरात लवकर उपलब्ध होत असते, तसेच उपभोक्त्याचा वेळ, श्रम, पैसा, ईत्यादींची बचत होते, व ग्रंथालयाची सुध्दा वेळ, श्रम, पैसा, ईत्यादींची बचत होते. हे दाखविण्यात आले आहे. अंकिय ग्रंथालयाशिवाय हे सहज शक्य झाले नसते.

**बीजशब्द :** अंकीय ग्रंथालय, बहुविध प्रसार माध्यमे, संप्रेषण, आभासी ग्रंथालय, सुचना प्रौद्योगिकी, इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय.

**प्रस्तावना:**

हरबॉट स्पेन्सरच्या मते, संपूर्ण जीवनाची तयारी म्हणजे शिक्षण. जीवन जगत असतांना मणुष्याला शिक्षणाची, ज्ञानाची आवश्यकता असते. आजच्या काळात माहितीचा स्फोट झाला आहे. नवीन नवीन माहितीचा रोज उदय होत आहे. आणि या ज्ञानाचा साठा करण्यासाठी, तो उपयोजकाला, विद्यार्थ्याला उपयुक्त करून देण्यासाठी अंकीय ग्रंथालय (Digital Library) महत्वाची भूमिका पार पाडत आहे.

विद्यापीठीय ग्रंथालयातील सर्व प्रकारचे वाचन साहित्य आणि संख्येने मोठा असलेला वाचक वर्ग लक्षात घेता अशा ग्रंथालयांना वेगवेगळी कामे कार्यक्षमतेने पार पाडावी लागतात. संगणक आणि दुरसंचार माध्यमाने तंत्रज्ञान आणि माहितीच्या क्षेत्रात फार मोठी क्रांती केलेली आहे. जगामध्ये सर्वच बाबतीत नेहमीच बदल होत असतो. ग्रंथालय क्षेत्रातही असे बदल होत गेले. सुरूवातीच्या काळात ग्रंथालये पारंपारीक पध्दतीने काम करीत असत. परंतु माहितीच्या ओघामुळे मनुष्याला अशक्यप्राय वाटणा–या गोष्टी संगणक युगात इंटरनेटच्या माध्यमामुळे शक्य झाल्या आहे. माहिती संशोधन व संकलन आता सोपे होउु लागले आहे. वाचकांचा वेळ वाचू लागला. ही माहिती इलेक्टॉनिक्सच्या विविध माध्यमाव्दारे साठवून ठेवता येउु लागली. उदा. तबकडी, हार्डडिस्क, सी.डी. पेन ड्राईव इत्यादी. यामुळे ग्रंथालयाचे पारंपारीक स्वरूप बदलत गेले. इलेक्ट्रॅनिक्स ग्रंथालये, अंकीय ग्रंथालये आणि आभासी ग्रंथालये यामध्ये रूपांतर होत गेले अर्थात या तीनही संकल्पनामध्ये फार फरक नाही.

अंकीय ग्रंथालये म्हणजे पारंपारीक ग्रंथालय करीत असलेली सर्व कामे उदा. तालीकीकरण, माहिती साठा, माहितीचा शोध व माहितीचे वितरण फक्त अंकीय स्वरूपात केली जातात. उदा. अंकीय साठा संप्रेषन तंत्रज्ञान, आज्ञावली पारंपारीक ग्रंथालयातील सेवा सुविधा यांचा विकास व विस्तार अंकीय ग्रंथालयात दिसून येतो. पण या सेवा अधिक कार्यक्षम व प्रभावीपणे दिल्या जातात.

अंकीय ग्रंथालयातील साहित्य संग्रह अंकीय स्वरूपात असतो. त्या साहित्याचे व्यवस्थापन व संघटन अंकीय पध्दतीने केले जाते साहित्याची प्राप्ती, त्यावरील तांत्रिक पक्रिया, माहिती साधने साहित्याचे वर्णन वगैरे सर्व गोष्टी अंकीय पध्दतीने पार पाडल्या जातात.

या ग्रंथालयात जगातील सर्व प्रकारच्या माहितीचा संग्रह असतो. ही माहिती जाळे ;इंटरनेटद्ध माध्यमातून उपलब्ध होवू शकते ही माहिती बहुविध प्रसार माध्यमे; मल्टिमिडीयाद्ध व्दारा उपलब्ध होत असल्यामुळे तिचे आकलन होण्यास सुलभ जाते. यासाठी केवळ एकच अंकिय ग्रंथालय पुरेसे नसते. अशी अनेक अंकीय ग्रंथालये जाळयाव्दारा एकमेकांशी जोडलेली असतात.

**वैशिष्टये :–**

१. माहितीचा वेग जास्त असतो.
२. दुर्मिळ ग्रंथ प्रत्यक्ष वाचायला मिळतात.

३. अंकीय ग्रंथालयातील माहितीसाठी तंत्रज्ञानाची जोड घ्यावी लागते.

४. या ग्रंथालयातील माहिती वाचकापर्यंत वैयक्तिकरित्या थेट मिळते.

५. पारंपारिक ग्रंथालयापेक्षा या ग्रंथालयातील सेवा अचूक, स्पष्ट व प्रभावी असतात.

६. जगातील कोणतीही माहिती, कोणत्याही ठिकाणी अनेक वाचकांना बहुविध प्रसार माध्यमामुळे ;आवाज, चित्रे वगैरेद्ध उपलब्ध होते.

७. अंकीय साहित्याच्या माध्यमाव्दारे साहित्याच्या अनेक प्रती काढणे गुणात्मक दृष्टीने सोपे जाते.

८. अंकीय माहितीच्या संपादनात माहितीची भर घालता येते. कालोघात नको असलेली माहिती काढून टाकता येते यासाठी लागणारा वेळ व मणुष्यबळ तांत्रिक साधनामुळे वाचतो.

९. माहितीच्या अंकीय स्वरूपामुळे जागतीक संगणक जाळयासाठी ;प्दजमतदमजद्ध माहिती पाठविता येते. कारण यातील माहिती साठाक्षमता जास्त आहे.

१०. कोणत्याही भुभागाची मर्यादा नसते.

११. या अंकीय ग्रंथालयातील माहिती वाचकाला स्वताच शोधावी लागते.

१२. हे काम खर्चिक आहे.

१३. अंकीय ग्रंथालयातील माहिती मिळविण्यासाठी संगणक, इंटरनेट, मोडेम या गोष्टी आवश्यक आहे.

आधुनिक काळातील ग्रंथालय हे माहिती तंत्रज्ञान वेळ आणि माहिती व्यवस्थापन यांच्यामुळे बदलत्या स्वरूपात सामोरे येत आहे. त्यांचे स्वरूप लहान होण्याकडे कल वाढत आहे. पण साहित्याच्या दृष्टीने सुप्त माहितीची भंडारेच आहेत. हे ग्रंथालय जागा आणि वेळ, लोकांमधील देशांमधील व खंडामधील कमी करीत आहे. जग फारच जवळ आलेले आहे. आधुनिक ग्रंथालयात अनेक गोष्टी नविन तंत्रज्ञानामुळे समाविष्ट होत आहेत. पारंपारिक ग्रंथालय व्यवस्थेमध्ये ' वाचक ' हि संज्ञा जास्त समर्पक होती. कारण ग्रंथालयातील वाचन साहित्याशीच वाचकाचा सबंध येत होता. पण काळानुरूप ग्रंथालयाच्या संकल्पनेत बदल होत गेले. त्यांचा उपयोग माहितीचा साठा माहितीचे संप्रेषन यासाठी करण्यात येवु लागला. त्यासाठी काही विशिष्ट साधने उपयोगात आणणे आवश्यक ठरले.

माहिती मिळविण्यासाठी उपयोजकापुढे अधिकृत व व्यक्तिगत असे दोन मार्ग उपलब्ध असतात. पारंपारीक वाचन साहित्य आणि संगणकिय सेवा ही अधिकृत माहिती मिळविण्याची साधने आहेत. पण काही वेळा उपयोजक आपल्या माहितीच्या गरजाच्या संदर्भात संगणकाच्या (इंटरनेटच्या) माध्यमातून माहिती मिळवित असतो.

संप्रेषणाच्या संगणकीय जाळयांचा उपयोग, आणि माहिती तंत्रज्ञान यांचा उपयोग प्रवेश, शोध आणि साहित्य मिळविणे यासाठी केला जातो. यामध्ये मुद्रीत साहित्याचा अंतर्भाव होत नाही. उपयोजकाला इच्छित माहिती प्रिंटरव्दारा मुद्रित करण्यापलिकडे यामध्ये मुद्रीत साहित्याचा अंतर्भाव होत नाही. उपयोजकाला इच्छित माहिती प्रिंटरव्दारा मुद्रित करण्यापलिकडे यामध्ये मुद्रित साहित्य समाविष्ट होत नाही. उपयोजकाला वैयक्तिकरीत्या त्याच्या संगणकावर सेवा उपलब्ध करून दिली जाते.

आधुनिक ग्रंथालयात अनेक गोष्टी नवीन तंत्रज्ञानामुळे समाविष्ठ होत आहेत. समाविष्ठ साहित्याप्रमाणे ग्रंथालया खालील प्रकार होतील.

**इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय** – या ग्रंथालयातील साधने ही दोन्ही प्रकारची असतात. इलेक्ट्रॉनिक साधने आणि पारंपारीक साधने या ग्रंथालयाचे कार्य पूर्णपण यांत्रीकीकरण पध्दतीने होते. उदा. संगणकीय जाळे इंटरनेट, सी डी रॉम,

**अंकीय ग्रंथालय** – यामध्ये सेवांचे पूर्ण यांत्रिकीकरण असते. सर्व साधने अंकीय स्वरूपात असतात. यामध्ये उपयोजक व अंकीय साधनांचा संगणकीय जाळयामार्फत अंतर्गत सबंध प्रस्थापित होत असतो. आणि तोही वैयक्तिक पातळीवर या ग्रंथालयांना कागद विरहित ग्रंथालय असेही म्हणतात.

**आभासी ग्रंथालय** – हे ग्रंथालय केवळ जाळयांच्या संग्रहावर आधारित असते. म्हणून याला साधन विरहीत ग्रंथालय असेही म्हणतात. यामध्ये ग्रंथ संग्रह नियतकालीके, वाचन कक्ष अथवा मदतीला कर्मचारी वर्ग असे कोणी नसते.

बहुविध प्रसारमाध्यमे त्यांनी तयार केलेले आभासी वातावरण उपयोजकाला साधने उपलब्ध करून देते. आभासी ग्रंथालय पध्दतीचा आदर्श हायपरमिडीयामध्ये निर्माण करता येतो. उपयोजक जसा माउुसची हालचाल करील तसे उपयोजकाला स्वत: त्या ग्रंथालयातून फिरत असल्याचा भास होतो. या आभासी ग्रंथालयात उपयोजक त्याला हव्या असलेल्या माहितीचा शोध घेतो. तो मिळाल्या नंतर आवश्यक वाटल्यास त्या माहितीचे मुद्रण प्रिंट करतो.

**निष्कर्ष :–**

आजची परिस्थिती लक्षात घेता अंकीय ग्रंथालयाचा उपयोग फार मोठया प्रमाणात होत आहे. आज संपूर्ण जगाला कोरोना या रोगाने ग्रासले आहे. त्यामध्ये आपला भारत देश सुध्दा वेगळा राहीला नाही. या देशाला सुध्दा कोरोना

या रोगाने थैमान घातले आहे. या रोगाने संपूर्ण मानव जातीला विळख्यात घेतले आहे. या रोगामूळे संपूर्ण जगाचा आर्थिक जैविक वित्तीय अशा सर्वच प्रकारची हानी झालेली आहे. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राचाही समावेश होतो. परंतु शिक्षण क्षेत्राला ब—याच प्रमाणात कमी हाणी होण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देण्यासाठी अंकीय ग्रंथालयाने खुप मोलाची भूमीका पार पाडली आहे. आजच्या या माहितीच्या युगामध्ये आवश्यक ती माहिती विद्यार्थ्यांना उपयोजकाला अंकीय ग्रंथालयामुळे (Digital Library) उपलब्ध होत आहे, आणि वाचकाचा वेळही वाचत आहे.

**संदर्भ :**

ग्रंथालय माहितीशास्त्र
प्रा. थोरात, लक्ष्मण
ग्रंथालय माहितीशास्त्र
प्रा. पवार, एस. पी.
उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक
डॉ. अहेर, हिरा
WWW. role of library